आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ जानेवारी २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ‘समुद्र प्रताप’ युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात दाखल

- भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन गेल्या ११ वर्षांमध्ये सहा पटींनी वाढल्याची इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

- IRCTC घोटाळ्यात राजद नेते लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्धच्या खटल्याला स्थगिती द्यायला दिल्ली उच्च न्यायालयाचा नकार

**आणि**

- अमेरिका व्हेनेझुएलावर तेल निर्यातबंदी लादणार; चीनकडून अमेरिकेचा निषेध

**<><><><><>**

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदूषण नियंत्रक ‘समुद्र प्रताप’ युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात आज गोवा इथं दाखल झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यावेळी उपस्थित होते. ही युद्धनौका सागरी प्रदूषण नियंत्रण नियमन, सागरी कायदा अंमलबजावणी, बचाव आणि शोध मोहीम राबवण्यात उपयोगी पडेल. ही युद्धनौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं सरंक्षण मंत्री यावेळी म्हणाले. सागरी जैवविविधतेचं संरक्षण करणं हे नैतिक जबाबदारी आहे, हे जहाज प्रवाळ खडक आणि समुद्री जिवांचं रक्षण करेल, असं ते म्हणाले.

- **- होल्ड बाईट राजनाथ - -**

नौदलाच्या ताफ्यात समुद्र प्रताप युद्धनौका समाविष्ट झाल्यामुळे भारतीय तटरक्षक दलाची क्षमता वाढणार असून सागरी सुरक्षा, पर्यावरण सरंक्षण आणि स्वदेशीच्या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

**<><><><><>**

भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन गेल्या ११ वर्षांमध्ये सहा पटींनी वाढलं असून निर्यात आठ पट वाढली असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी

वैष्णव यांनी समाजमाध्यमवरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या वर्षभरात फक्त ॲपल कंपनीनेच ५ हजार कोटी मूल्याचे मोबाईल फोन निर्यात केले होते असं त्यांनी पुढे म्हटलंय.

या वर्षभरात देशात ४ नवे इलेक्ट्रॉनिक्स कारखाने सुरु होणार आहेत. सध्या या क्षेत्रात २५ लाख  रोजगार उपलब्ध असून काही कंपन्यांची एका कारखान्यात ४० हजार पर्यंत नोकऱ्या देण्याची क्षमता आहे,  असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

IRCTC घोटाळ्यात राजद नेते लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्धच्या खटल्याला स्थगिती द्यायला आज दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला. तसंच, या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. आपल्या विरुद्ध झालेल्या आरोपनिश्चितीला आव्हान देणाऱ्या यादव यांच्या याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या १४ तारखेला होणार आहे. गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांची पत्नी राबडीदेवी, मुलगा तेजस्वी आणि इतर ११ जणांविरुद्ध फसवणूक, गुन्हेगारी कट रचणं आणि भ्रष्टाचाराच्या खटल्यात आरोप निश्चित करण्यात आले होते.

<><><><>

पश्चिम बंगालमध्ये मतदार यादी सखोल पुनरीक्षण शिबिरांना भेट देताना मतदार यादी निरीक्षकावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी केंद्रीय निवडणूक आयोगाने कारवाई अहवालाची मागणी केली आहे. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात मतदार यादी पुनरीक्षण शिबिरांना भेट देतेवेळी मतदार यादी निरीक्षक सी. मुरुगन यांच्यावर जमावाने हल्ला केला. निवडणूक आयोगाने या प्रकरणासंदर्भातल्या कारवाईचा अहवाल उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत राज्याचे पोलीस महासंचालक राजीव कुमार यांनी सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसंच, यापुढे अशा प्रकारच्या भेटीवेळी सुरक्षेची संपूर्ण व्यवस्था ठेवावी तसंच, एक वरिष्ठ पोलीस अधिकारीही नियुक्त करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत.

<><><><>

गुजरातमधलं सोमनाथ मंदिर अनेक आक्रमणांना आणि अतिशय प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत गेली हजारो वर्षं टिकून राहिलं आहे, यातून भारतीय संस्कृतीचं अक्षय चैतन्य दिसून येत असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सोमनाथ मंदिरावर

झालेल्या पहिल्या हल्ल्याला एक हजार वर्षं पूर्ण झाल्याबद्दल समाजमाध्यमांवर लिहिलेल्या एका संदेशात त्यांनी या घटनेचं स्मरण केलं आहे. सोमनाथ मंदिराचं शेवटचा जीर्णोद्धार सरदार पटेल यांच्या देखरेखीखाली सुरु झाला होता, तो मे १९५१ मध्ये पूर्ण झाला आणि तत्कालीन राष्ट्रपती डॉ राजेंद्र प्रसाद यांच्या उपस्थितीत मंदिर भाविकांना खुलं करण्यात आलं होत. या घटनेलाही येत्या मे महिन्यात ७५ वर्ष पूर्ण होत आहेत याची आठवण मोदी यांनी करून दिली.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ मुरली मनोहर जोशी यांना त्यांच्या जन्मदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ जोशी यांची समाजसेवेसाठी आणि विशेषतः शैक्षणिक क्षेत्र आणि संस्कृती संवर्धनाप्रती असलेली आजीवन कटिबद्धता सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिका व्हेनेझुएलाच्या दैनंदिन कारभारात लक्ष देणार नसून राजकीय बदल घडवून आणण्यासाठी तेल निर्यातबंदी लागू करेल, असं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी सांगितलं आहे. दोन दिवसांपूर्वी व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अमेरिकेने ताब्यात घेतल्यानंतर व्हेनेझुएलाचं सरकार अमेरिका चालवेल, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं. त्या पार्श्वभूमीवर रुबियो यांनी हे विधान केलं आहे. व्हेनेझुएलाच्या उपराष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी देशाच्या हंगामी अध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतली आहेत. त्यानंतर डेल्सी यांनी अमेरिकेला व्हेनेझुएलातल्या कच्च्या तेलाचे स्त्रोत वापरण्याची, त्याचं नियमन करण्याची मुभा द्यावी, अन्यथा वाईट परिणामांना सामोरं जावं लागेल अशी ताकीद डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.

चीनने अमेरिकेचा तीव्र निषेध केला आहे. जगाचे न्यायाधीश म्हणून अमेरिकेने वागू नये असा इशारा चीनने दिला आहे. अमेरिकेची गुंडगिरी वाढत असून सर्व देशांचं सार्वभौमत्व आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार जपलं गेलं पाहिजे असं चीनचे परराष्ट्र व्यवहार मंत्री वांग यी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेने व्हेनेझुएलात केलेल्या लष्करी कारवाईत क्युबाचे ३२ लष्करी आणि पोलीस अधिकारी मारले गेल्याचं क्युबानं म्हटलं आहे. मृत अधिकाऱ्यांना आदरांजली वाहण्यासाठी क्युबाने दोन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

**<><><><><>**

भारत रशियाकडून करत असलेल्या तेल खरेदीमुळे मी नाराज आहे आणि केव्हाही आयातशुल्क वाढ करेन याची प्रधानमंत्री मोदी यांना पूर्ण कल्पना होती, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. अमेरिकन एअर फोर्स वन या विमानात काल ते वार्ताहरांशी बोलत होते.

अमेरिकेने भारतावर लावलेल्या वाढीव आयात शुल्काचे परिणाम म्हणूनच भारताने रशियाकडून तेल खरेदी कमी केली आहे, अशी टिप्पणी अमेरिकन सिनेटर लिंडसी ग्रॅहम यांनी यावेळी केली होती त्याची प्रतिक्रिया म्हणून ट्रम्प यांनी हे विधान केलं.

**<><><><><>**

गेल्या वर्षात भारताच्या उर्जा क्षेत्रात भरीव अशा सुधारणा झाल्या. अक्षय्य उर्जेकडे वाटचाल करताना भारताने २०२५ या वर्षात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सुधारणांची अंमलबजावणी केली. याविषयी आता सविस्तर ऐकुया...

**व्हीसी**

*(भारताने २०२५मध्ये अणुविषयक राजनैतिक संबंधाबरोबरच इतर सुधारणांवर भर दिला. शांती हे अणुसंबंधित विधेयक मंजूर झाल्यानंतर हे क्षेत्र खासगी गुंतवणुकीसाठी खुलं करण्यात आलं. यामुळे आता २०२७पर्यंत अणुउर्जा प्रकल्पांमध्ये देशांतर्गत स्तरावर खासगी तसंच परदेशी गुंतवणूकदारांकडून १०० ते १५० अब्ज डॉलर्सचं नवीन भांडवल उपलब्ध होईल. तसंच अणुउर्जा निर्मितीत १२ ते १४ पट वाढ होण्याची अपेक्षा असून जीवाश्म इंधन निर्मितीत होणाऱ्या कार्बन उत्सर्जनात घट होईल. एकिकडे उर्जेच्या अखंडित पुरवठ्यासाठी पार्श्वभूमी तयार करत असतानाच भारताने सौर आणि पवनउर्जेवरही भर दिला. उर्जा निर्मितीत लागणाऱ्या खनिजांच्या पुरवठ्यावरही लक्ष केंद्रित केलं. राष्ट्रीय खनिज अभियानाच्या माध्यमातून या धोरणासाठी सुमारे ३२ हजार कोटी रुपयांचा सार्वजनिक निधी उपलब्ध करून देण्यात आला. या धोरणात अक्षय्य उर्जा, इलेक्ट्रॉनिक्स,*

*एअरोस्पेस तसंच संरक्षण सामग्री उत्पादनात आवश्यक असलेल्या २४ खनिजांचा समावेश आहे.)*

**<><><><><>**

२०२० च्या दिल्ली दंग्याप्रकरणी अटकेत असलेला विद्यार्थी नेता उमर खालीद आणि शरजील इमाम यांचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. या दोघांना प्रथमदर्शनी यूएपीए अर्थात बेकायदेशीर कारवाई प्रतिबंधक कायद्या अंतर्गत अटक झाली असल्याचं कारण न्यायालयाने दिलं. दुसरीकडे याच खटल्यातील आरोपी गुलफीशा फातीमा, मीरन  हैदर, शिफा उर रहमान, सलीम खान आणि शादाब अहमद यांना न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन. व्ही.  अंजारीया यांच्या खंडपीठाने जामीन मंजूर केला.

**<><><><><>**

आसामला आज पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमाराला भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाची तीव्रता ५ पूर्णांक १ दशांश रिक्टर स्केल इतकी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू मोरीगाव जिल्ह्याजवळ ५० किलोमीटर खोलवर आहे. हा भाग मध्य आसामचा असून भूकंपात अद्याप कोणतीही जीवित आणि वित्तहानी झालेली नाही. भूतान, नेपाळ आणि बांगलादेश या शेजारच्या देशांमध्येही भूकपांचे धक्के जाणवले.

**//<><><><><>//**